# सचिन सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित

मिठागर रोड, मुलुंड (पूर्व), मुंबई - ४०००८१

(Regd. No. BOM/HSG.1629 OF 1968)

दि. २६/०८/२०२३

## सूचना

सचिन सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की संस्थेची २०२२-२३ या सहकारी वर्षाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक १० सप्टेंबर २०२३ रोजी सकाळी ठिक ९.३० वाजता संस्थेच्या श्री गणेश मंदिरात खालील विषय सूचीनुसार कामकाज करण्यासाठी आयोजित केली आहे.

### विषयसूची

१) लेखापरिक्षण २०१९-२० / २०२०-२१ / २०२१-२२ चे वैधानिक लेखापरिक्षण करणे आवश्यक होते. त्यासाठी आपण वि.स. सभेमध्ये लेखापरिक्षकाची नेमणूक केली होती. परंतु डी.डी.आर कोकण भवन यांनी श्रीमती. मनिषा पाटील लेखापरिक्षक यांची नेमणूक केली आहे परंतू या तीन वर्षाच्या कालावधीचे लेखापरिक्षणासाठी आवश्यक असणारे दस्तऐवज संस्थेच्या ताब्यात आजतागायत प्रशासक श्री. निंबाळकर यांनी संस्थेकडे हस्तांतरित केलेले नाही. याबाबत प्रशासक, उपनिबंधक व डी.डी.आर यांच्याशी पत्रव्यवहार केलेला आहे. त्याबाबत सर्वसाधारण सभेला अवगत करणे.

२) २०२२-२३ चे लेखापरिक्षण करण्यासाठी एस.एस.एन.एम चे श्री. मलुष्टे यांची नेमणूक मागील वि. सर्वसाधारण सभेमध्ये झाली होती. परंतु विषय १ मध्ये नमूद केल्याप्रमाणे जोपर्यंत २०२१-२२ पर्यंतचे लेखापरिक्षण होत नाही तोपर्यंत पुढील लेखापरिक्षण करण्याची असमर्थता लेखापरिक्षकांनी व्यक्त केलेली आहे.

३) बी.एम.सी ची मालमत्ता कर सुमारे ५० लाखाची थकबाकी होती. याबाबत सर्व साधारण सभेला अवगत करणे.

४) इमारतींचा Assurance बाबत सर्वसाधारण सभेला अवगत करणे.

५) बँक ऑफ महाराष्ट्राला दिलेल्या इमारत क्र. १ मधील जागेबाबत बँकेच्या Zonal Manager बरोबर झालेल्या चर्चेबाबत सर्वसाधारण सभेला अवगत करणे.

६) सभासदांनी मागणी केलेल्या पत्रानुसार झालेला पुनर्विकासाबाबत दि.२३.०७.२३ विशेष सर्वसाधारण सभेमध्ये सभासदांची कौल बघता त्या संबंधी व्यवस्थापन समितीने काही पाऊले उचलण्याचे ठरविले आहे. त्या संदर्भात प्रकल्प सल्लागाराची नेमणूक करणे व संकेत स्थळाची निर्मित करण्याच्या दृष्टीने झालेल्या प्रगती बाबत. सर्वसाधारण सभेस अवगत करणे.

७) मानिव अभिहस्तांतरण इमारत क्र. ५, सी.टी.एस क्र. ९२२ च्या मानिव अभिहस्तांतरणाचा आदेश दि. ०४.०८.२०२० रोजी डी.डी.आर डॉ. प्रशांत सोनावणे यांनी दिलेला आहे. त्या आदेशाची मुदत वाढविणे (Revalieclanja) आवश्यक आहे. त्यासाठी योग्य त्या कार्यपध्दतीचा अवलंब करण्यासंबधी सल्ला /मार्गदर्शन करण्यासाठी योग्य त्या वकीलाची नेमणूक करणे व त्यासाठी लागणाऱ्या मानधनास व खर्चास सर्वसाधारण सभेला अवगत करणे व मान्यता प्राप्त करुन घेणे.

८) इमारत क्र. ५ - बी च्या विजेच्या मीटर बॉक्सला दि. ०८.०३.२०२३ रोजी आग लागली होती. त्याबाबत केलेल्या उपाय योजनांची माहिती सर्वसाधारण सभेला अवगत करणे.

९) २०२३-२४ च्या वैधानिक लेखापरिक्षणासाठी लेखापरिक्षकाची नेमणूक करणे.

१०) अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळी येणारे अन्य विषय.

Milind

मानद सचिव

(मिलिंद के.राऊळ)

**टिप :**

१) जर प्रस्तावित वार्षिक सर्वसाधारण सभा गणसंख्येच्या अभावी जर विहित वेळेवर सुरु करता आली नाही तर ही सभा अर्धा तास तहकूब करुन त्याच दिवशी त्याच ठिकाणी प्रस्तावित करण्यात आलेल्या विषयांवर चर्चा करुन निर्णय घेण्यासाठी भरविण्यात येईल व त्यासाठी गणसंख्येची आवश्यकता रहाणार नाही.

२) सदस्यांना वरील विषयांबाबत काही माहिती हवी असल्यास त्यांनी त्याबाबत दिनांक ०५.०९.२०२३ पर्यंत लेखी सूचना द्यावी. ही माहिती सभेत त्या विषयांवरील चर्चेच्या वेळी दिली जाईल.

३) या सभेस सभासद व सहयोगी सभासद हेच केवळ उपस्थित राहून कामकाजात भाग घेऊ शकतील.

४) वरील विषय सूचीबाबतची टिप्पणी पुढील २/३ दिवसात देण्यात येईल.

**सूचनेची प्रत :-**

१) संस्थेचा नोटीस बोर्ड.

२) उपनिबंधक, सहकारी टी विभाग, मुलुंड (प.), मुंबई- ४०० ०८०.

३) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (२) पूर्व उपनगरे कोकण भवन

४) जिल्हा उपनिबंधक, सहकारी गृ.नि.संस्था महासंघ मर्यादित मुंबई- ४०० ००१.